# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/१०/२०२५ (गुरूवार )**

---

## वेजलपुर पोलीस स्टेशन, जि. अहमदाबाद, राज्य गुजरात येथील घरफोडीच्या गुन्हयातील सराईत पाहीजे आरोपीचा नरखेड पोलीसांनी घेतला शोध
## नागपुर ग्रामीण पोलसांची कामगिरी

दिनांक २२/१०/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना पोलीस स्टेशन वेजलपुर जि अहमदाबाद, राज्य गुजरात यांचे कडुन माहीती प्राप्त झाली की, पोलीस स्टेशन वेजलपुर येथील दाखल अप क्रमांक ६०३/२०२५ कलम ३०५ (अ),३३१(४) भान्यासं या घरफोडीच्या गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे आशिष महेंद्र देशभ्रतार हा नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील खैरगाव येथे त्याचे नातेवाईकाकडे आलेला आहे. श्री अनिल म्हस्के यांनी सदर माहीती मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना दिली. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री अजित कदम, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन नरखेड आणि त्यांच्या पथकाने तात्काळ खैरगाव येथे जावुन नमुद आरोपीचा शिताफिने शोध घेवुन त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने नाव **आशिष महेंद्र देशभ्रतार, वय २२ वर्षे, रा. महालक्ष्मी नगर, अहमदाबाद जि गुजरात** असे सांगितल्याने हा तोच आरोपी असल्याची खात्री झाली. नरखेड पोलीसांनी सदर आरोपीला ताब्यात घेत वेजलपुर पोलीसांना माहीती दिली. **नमुद आरोपी हा पोलीस स्टेशन वेजलपुर येथील अभिलेखावरील सराईत आरोपी आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीसांच्या तत्परतेने पोलीस स्टेशन वेजलपुर येथील घरफोडीच्या गुन्हयातील आरोपी मिळुन आला. नमुद आरोपीला नरखेड पोलीसांनी वेजलपुर पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.**

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात आरोपीचा अवघ्या ४ तासात घेतला शोध आरोपीस अटक, कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २२/१०/२०२५ रोजी पोस्टे कुही अंतर्गत मौजा आकोली बसस्टॉप रेल्वे ब्रीजच्या आवारातील रेल्वेच्या शासकीय इमारतीत एक अज्ञात इसम जखमी अवस्थेत पडलेला आहे अशी माहीती कुही पोलीसांना स्थानिकांकडुन प्राप्त झाली. माहीती प्राप्त होताच कुही पोलीसांनी तात्काळ घटनास्थळावर आकोली बसस्टॉप रेल्वे ब्रीजच्या आवारामध्ये असलेल्या रेल्वे च्या शासकीय इमारतीमध्ये जावुन पाहणी केली असता एक अज्ञान इसम डोक्याला, मानेला जखमा होवुन रक्तबंबाळ अवस्थेत पडुन दिसला. पोलीसांनी तात्काळ  जखमीला औषोधोपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे दाखल केले. सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीसांनी तात्काळ सदर प्रकरणाचा तपास सुरू करत जखमी याचे नाव कुंदन विलास सदा,वय २८ वर्ष, रा. गाव दिगणी, जिल्हा खगरीया, राज्य बिहार असे असल्याचे निष्पन्न केले तसेच गुप्त बातमीदाराच्या मार्फतनीने अज्ञात आरोपीचा शोध घेतला असता नमुद गुन्हयातील जखमी हा  दिनांक २१/१०/२०२५ रोजी रात्री आरोपी नामे अभिषेक विष्णु गजभिये, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ आकोली, ता. कुही जि नागपुर याच्यासोबत आकोली बसस्टॉप येथे बोलत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. आरोपी नामे अभिषेक विष्णु गजभिये याल ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता त्याने जखमी याचे सोबत झालेल्या किरकोळ वादातुन त्याला मारहाण करून गंभिररित्या जख्मी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला अशी माहीती पोलीसांना प्रात्प झाली.

सदर प्रकरणी नमुद आरोपींविरूद्ध कलम १०९(१) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला असुन **कुही पोलीसांनी अज्ञात आरोपीचा अवघ्या ४ तसात शोध घेवुन आरोपीला अटक**

**केली आहे**. मा. न्यायालयाने नमुद आरोपीचा दिनांक २६/१०/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

## अवैधरित्या देशीदारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २३/१०/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू एकुण किंमती ४१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी लक्ष्मन पांडुरंग चव्हान, वय ३८ वर्ष, रा. मांडवा, लभान, ता.भिवापुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरेखेड** येथे आरोपी नामे २) सुधाकर लुग्रळे दुधकवडे वय ४८ वर्ष रा, मोहदी दळवी, ता नरखेड, ३) संजय बस्तिराम धुर्वे, वय ३० वर्ष, रा, गोधनी गायमुख ता नरखेड,यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** आरोपी नामे ४) सेवकराम लच्छीराम कदरे, वय ६५ वर्ष, रा. खानगाव ता. सावनेर, ५) प्रकाश उर्फ ठुसकी केशवजी कारेमोरे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र ०२ खुरजगाव ता. सावनेर जि नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन कोंढाळी** आरोपी नामे ६) रवि कृष्णांजी खंडाते, वय ४५ वर्ष, रा. अडेगाव , ७) राज उर्फ राजरतन गुलाबराव गायकवाड, वय ३६ वर्ष, रा. चंदनपारडी ता. काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी** आरोपी नामे ८) पुर्णचंद्र सुखदेव नायक, वय ४९ वर्ष, रा. गणेशपुर,याचेवर १ गुन्हा नोंद आहे अशा ८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ८ गुन्हे दाखल केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २३/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन वेलतुर** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत मिसाळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांनी कुजबा गावातील ग्रामस्थांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. जर कोणी तुम्हाला व्हीडीओ कॉल करून पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून डिजिटल अरेस्ट (अटक) करणार आहोत असे सांगुन पैशांची मागणी करत असेल तर त्यांच्या वर विश्वास ठेवु नका. पोलीस कधीही ऑनलाईन किंवा फोनवरून अटक करत नाहीत.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930 , 1945 यावर तक्रार नोंदवा.**



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २२/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २३/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी आणि पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी हद्दीत पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले.तसेच नाकाबंदी करून वाहने तपासण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार आणि दंगा नियंत्रण पथकचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने